**सत्य  घटना**

रस्त्यावरच्या खड्ड्यात मी पाहिले.

गुलमोहराच्या पानाची नाव करून,

एक मुंगी तो खड्डा पार करत होती.

तिचा प्रयत्न, त्या प्रयत्नांची पराकाष्टा पाहून;

मी थकून गेले, मला ते पाहवेना

आणि काहीतरी करावस वाटले म्हणून राहवेना.

मी चक्क त्या मुंगीला पानासाहित उचलले

आणि खड्ड्याचा दुसऱ्या किनाऱ्यावर ठेवले.

तिने माझ्याकडे पाहिले नि तिच्याकडचा साखरेचा दाणा तिथेच ठेवला

बहुतेक तो तिने माझ्यासाठीच ठेवला

मी तिच्याकडे बघतच राहिले.

विचार करत होते एवढ्या छोट्या उपकाराची फेड एवढी गोड.

मी विचारात हरवली आणि ती अचानक दिसेनाशी झाली

मी लगेच तिला शोधले

जेव्हा दिसली तेव्हा ती पुन्हा पाण्याच्या दिशेला निघाली होती

बहुतेक तिला रित्या हाती घरी जायचे नव्हते.

देवाचे आभार की त्याने मला तेवढ्यात सूचना दिली

मी पटकन तो दाणा मुंगी आणि खड्ड्याच्या मध्ये ठेवला.

माझ्या नशिबाने त्या मुंगीला तो दाणा मिळाला.

ती तो दाणा घेवून पुन्हा तिच्या घराकडे वळली नि माझी कथा संपली.